REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 6 | MARCH - 2022

# हिंदू–मुस्लिम वैमनस्याची ऐतिहासिक वाटचाल

डॉ. वसंत गायकवाड
सी.जे.पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,तिरोडा.
जिल्हा– गोदिंया,(महाराष्ट्र)



हिंदू आणि मुसलमान यांच्यात वैमनस्य नव्हतेच तर त्यांच्यात सलोखा होता. परस्परांच्या समारंभात ते एकोप्याने भाग घेत. हिंदू लोक मुसलमान संतांना व पीरांना भजत व मुसलमान लोकही हिंदू संतांना सन्मान देत असत. हा सामाजिक सद्भाव नष्ट का झाला? हिंदू आणि मुसलमान एकमेकांचे कट्टर वैरी कसे झाले? या प्रश्नांची उत्तरे भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात आपल्याला सापडतात.

मुस्लिम राज्यकर्त्यांनी भारतावर जवळपास 550 वर्षे राज्य केले. अठराव्या शतकात ब्रिटिशांच्या उदयाने मुसलमानांची सत्ता गेली. स्वाभाविकच सत्ता मुस्लिम राज्यकर्त्यांकडून हस्तांतरित झाल्यामुळे ब्रिटिशांनी मुस्लिमांना दाबून ठेवण्याच्या धोरणाचा अंगीकार केला. त्या काळचा मुसलमान समाज धार्मिक मूलतत्त्ववादी होता. आधुनिक सुधारणेचा स्पर्श त्याला झालेला नव्हता. एकोणविसाव्या शतकात जी प्रबोधनाची चळवळ सुरू झाली तशाच प्रकारची सुधारणावादी चळवळ 'बहाबी' आंदोलनाद्वारा मुस्लिम समाजातही झाली. ''हया समाजातील कुप्रथा नष्ट करून त्यात सुधारणा घडवून आणण्याचा पहिला प्रयत्न बहाबी आंदोलनाच्या माध्यमातून झाला. मुसलमान ही स्वतंत्र जमात आहे ही प्रेरणा बहाबी चळवळीने निर्माण केली.''[1] यातूनच मुस्लिम ही हिंदूपेक्षा वेगळी अलग, स्वतंत्र अशी जमात आहे, ही भावनाही निर्माण झाली.

1857 ला राष्ट्रीय उठाव झाला, या उठावाचे नेतृत्व बहादूरशह जाफरने केले. शेवटी हा राष्ट्रीय उठाव फसला. या उठावात ''हिंदूंच्या तुलनेत मुसलमानांवर कठोर प्रहार करण्यात आले. त्याचा एक परिणाम म्हणजे हिंदू मुसलमान यांच्यात वितुष्ट निर्माण होऊ लागले.''[2] हिंदू–मुसलमान यांच्यातील वैमनस्याची सुरुवात अशा प्रकारे ब्रिटिशांनी केली. ही वैमनस्याची ठिणगी पुढे विकसित होत गेली.

सर सय्यद अहमद खान यांनी जानेवारी 1877 ला 'मुस्लिम ॲंग्लो–ओरिएंटल कॉलेज'ची स्थापना केली. याचेच पुढे अलीगढ विद्यापीठात रूपांतर झाले. विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन त्यांच्या मनात नवी आधुनिक मूल्ये रुजविणे व त्यांच्यातील कर्मठपणा नाहीसा करणे हा या विद्यापीठ स्थापनेमागील उद्देश होता. मुस्लिमांचे प्रबोधन हे धेय्य ठेवून हे विद्यापीठ कार्यरत होते. ''मुसलमानांमध्ये असलेला मागासलेपणा व त्यांच्यातील कर्मठवृत्ती नाहीशी करून त्यांना पाश्चात्त्य शिक्षण देऊन त्यांच्यात सुधारणा करणे हा या चळवळीचा मुख्य उद्देश होता.''[3] थेओडोर बेक हे या कॉलेजचे पहिले प्राचार्य. यातून बाहेर पडलेल्या अनेक मुस्लिम युवकांनी शिक्षण, सरकारी नोकरी आणि सार्वजनिक जीवनात नावलौकीकही मिळवला. इंग्रजांनी भारतात सुरू केलेल्या सार्वजनिक शिक्षणप्रणालीतून सुरुवातीला हिंदूंनी शिक्षण घ्यायला सुरुवात केली. त्यामुळे इंग्रजांच्या राज्यात नोकऱ्या करणारे बहुतांश हिंदू होते. मुस्लिम समाज त्याच्या कर्मठपणामुळे शिक्षित होऊ शकला नाही. तो मागासलेला राहिला. कदाचित हे लक्षात घेऊनच सर सय्यद अहमद खान यांनी मुस्लिमांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा केला असावा. मुस्लिम समाजातील सुधारणेची आणि आधुनिकतेची ही वाटचाल महत्त्वाची होती.

सुरुवातीला सर अहमद खान यांनी हिंदू–मुस्लिम ऐक्यावर भर दिला; परंतु कालांतराने थेओडोर बेक यांच्या संपर्कामुळे त्यांचे मानसिक परिवर्तन झाले आणि राष्ट्रीय चळवळीपासून दूर झाले. ''मुसलमानांनी राष्ट्रवादी चळवळीपासून दूर राहिले पाहिजे, नाहीतर त्यांचे नुकसान होईल, असा प्रचार त्यांनी केला. ब्रिटिश सरकारशी निष्ठा हीच त्यांची शिकवण होती. अखंड भारत ही कल्पनाच त्यांना मान्य नव्हती. हिंदुस्थानात हिंदू व मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत हीच त्यांची विचारसरणी होती.''[4] त्यांच्या या विचारसरणीचा परिणाम हिंदू–मुसलमान यांच्यातील शत्रुत्व विकसित करण्यात झाला. पुरोगामी विचारांनी सुरू झालेली ही चळवळ शेवटी धर्मवादी झाली.

1905 ला लार्ड कर्झनने बंगालची फाळणी केली. परंतु या फाळणीमागेही मुसलमानांना स्वतंत्र प्रांत देऊन खूश करायचे आणि हिंदू–मुस्लिम ऐक्यावर आघात करून स्वातंत्र्य चळवळीला कमजोर करायचे, असे कुटिल कारस्थान होते. याचाही परिणाम हिंदू–मुस्लिम यांच्यात दूरत्व निर्माण करण्यात झाला.

31 डिसेंबर 1906 ला 'अखिल भारतीय मुस्लिम लीग' स्थापना झाली. ब्रिटिश सरकारविषयी निष्ठा आणि मुस्लिमांच्या हितसंबंधाचे संरक्षण ही उद्दिष्टे मुस्लिम लीगच्या स्थापनेमागे होती. मुस्लिमांच्या संखेचा विचार करता त्यांना घटनात्मक व्यवस्थेत प्रतिनिधित्व मिळावे आणि मुस्लिम प्रतिनिधीची निवड इथल्या मुस्लिमांनी करावी या त्यांच्या प्रमुख मागण्या होत्या. काही काळ राष्ट्रीय काँग्रेससोबत त्यांनी सहकार्य केले. परंतु कालांतराने 'मुस्लिम लीग' जातीय राजकारणाकडे झुकली. 1930 ला डॉ. महंमद इकबाल हे 'मुस्लिम लीग'चे अध्यक्ष झाले. त्यांनी हिंदुस्थानच्या राजकीय व्यवस्थेअंतर्गत 'मुस्लिम इंडिया'च्या स्थापनेची मागणी केली. पाकिस्तानच्या निर्मितीची बीजे इथेच पेरली गेली.

वरील विवेचनावरून स्पष्ट आहे की, ब्रिटिशांनी आपली सत्ता टिकविण्यासाठी मुसलमानांमध्ये हिंदूविषयीची द्वेष भावना निर्माण केली. 'फोडा आणि झोडा' ही त्यांची नीती होती. त्यामुळे राजकीय पक्षपाताचे धोरण त्यांनी नेहमीच अवलंबिले. जेव्हा मुस्लिमांपासून धोका आहे असे जाणवले तेव्हा त्यांनी हिंदूंना जवळ केले आणि जेव्हा हिंदूपासून धोका आहे असे जाणवले तेव्हा त्यांनी मुस्लिमांच्या मनात हिंदूविषयीचा द्वेष भरविला. यातूनच हिंदू आणि मुसलमान एकमेकांच्या विरोधात उभे राहिले. दंगे सुरू झाले. भारतातून पाकिस्तानची निर्मिती झाली. फाळणीच्या वेळी हजारो गरीब हिंदू आणि मुस्लिमांची कत्तल झाली. राष्ट्रीय संपत्तीचे अतोनात नुकसान झाले. शेवटी या गरीब हिंदू–मुसलमानांच्या प्रेतांवर पाकिस्तान नावाचे नवे मुस्लिम राष्ट्र निर्माण झाले. परंतु त्यानंतरही वैमनस्याची ही दरी कमी झाली नाही. ती अधिकाधिक वाढत गेली . आजही ती ठिणगी पेट घेते आणि मानवतेला कलंकित करीत असते.

## हिंदू–मुस्लिम वैमनस्याचा रक्तरंजित इतिहास –

भारत स्वतंत्र होण्याच्या वेळीच भारताची फाळणी झाली. भारत आणि पाकिस्तान हे दोन स्वतंत्र देश अस्तित्वात आले. वास्तविक भारतातील ही फाळणी हिंदू–मुस्लिम समाजातील उच्चवर्णीयांच्या राजकारणाची परिणती होती. फाळणीचा मुस्लिम समाजावर अत्यंत वाईट परिणाम झाला. फाळणीपूर्वी दहशतीच्या वातावरणात ज्या मुस्लिमांनी पाकिस्तानात जायचा प्रयत्न केला किंवा जे पाकिस्तानात गेले, ते मुख्यतः व्यापारी, जमीनदार, कलावंत, श्रीमंत आणि मध्यमवर्गीय सुशिक्षित होते. जे भारतात राहिले ते भूमिहीन, शेतमजूर, कारागीर, गरीब असे सामान्य लोक होते. शिक्षणापासून ही सामान्य माणसे दूर होती. स्वाभाविकच या वर्गावर धर्मातील उलेमांचे आणि मुल्ला मौलवींचे वर्चस्व होते. शिक्षणाचा अभाव आणि आर्थिक दुर्बलता यामुळे भारतात असणाऱ्या मुस्लिमांची परिस्थिती अधिकच वाईट झाली.

फाळणी ही उच्चवर्णीय हिंदू–मुस्लिमांच्या धर्मवादी राजकारणाची परिणती होती. भारतीय मुस्लिमांच्या जीवनात फाळणीने नव्या समस्या निर्माण केल्या. फाळणीसाठी मुस्लिमांना दोषी ठरविण्यात येऊ लागले. त्यांच्या राष्ट्रप्रेमाला संशयाच्या भोवऱ्यात उभे केले जाऊ लागले. मुस्लिमांना देशद्रोही ठरविण्यात येऊ लागले. या वातावरणात भर घातली ती हिंदुत्ववादी राजकारणाने. भारत हे हिंदू राष्ट्र आहे, याचा उच्चार अभिनिवेशाने होऊ लागला. ''गर्व से कहो हम हिंदू है – या मुस्लिम है, या ख्रिश्चन है।'' अशा धर्मद्वेष पसरविणाऱ्या घोषणा दिल्या जातात. 'मंदिर वही बनाऐंगे' चा जयघोष होतो. हिंदू आणि मुस्लिम यांच्यात वैर धुमसत राहावे यासाठी ''अत्यंत थंड मनाने द्वेष निर्माण केला जातो. परस्परविरोधी द्वेष भावनेमुळे शेजारचे परधर्मीय शत्रू ठरतात. शत्रूला डिवचले की तो पण प्रक्षुब्ध होतो. अशा संघर्षात आक्रमकपणा वाढतो''[5] आणि रक्तरंजित दंगलींचा पाया घातला जातो.

फाळणीनंतर काही दिवसांनी मोठे दंगे झाले. तरी पण 1961 पर्यंतचा कालखंड हा शांततेचा कालखंड मानावा लागेल. या काळात दंगली उसळल्या नाहीत. या शांततेच्या कालखंडाला गालबोट लागलं. 1962 च्या जबलपूर येथे झालेल्या दंगलींनी यानंतर एकापाठोपाठ एक अशी दंगलींची मालिकाच तयार झाली. राऊरकेला (1964), रांची (1967), भिवंडी (1967), जमशेटपूर (1979), मेरठ (1987), भागलपूर (1989) अशा ह्या मोठ्या दंगली होत्या. 6 डिसेंबर 1992 ला बाबरी मशीद पाडण्यात आली. बाबरी मशीद पाडल्यानंतर मुंबई, सूरत, भोपाळ या शहरांत हिंसक प्रतिक्रिया उमटल्या आणि आजपर्यंत देशाने न पाहिलेल्या, न अनुभवलेल्या धार्मिक दंगली झाल्या, भारतीय इतिहासातील हे स्वकीयांनीच केलेलं, अंगावर शहारे आणणारं हे रक्तदान होतं. शहरी भागाप्रमाणे ग्रामीण जनजीवनही या दंगलींनी प्रभावित केलं. हजारो हिंदू–मुस्लिम लोकांचं रक्त इथल्या भूमीत सांडलं.

या दंगलीसाठी धर्मद्वेषाचे विष पसरविण्यात येते. समूहाच्या मानसशास्त्राचा आधार घेतला जातो. दुसऱ्या बाजूने होणाऱ्या हल्ल्याची ीती मनावर बिंबविली जाते. प्रक्षोभक घोषणा दिल्या जातात. अफवा पसरविल्या जातात. माध्यमांचा चलाखीने वापर केला जातो. हिंसाचाराची व्याप्ती वाढविली जाते आणि शेवटी ज्यांचा या घटनांशी प्रत्यक्ष संबंध नसतो अशा निरपराध माणसांचा बळी घेतला जातो. ''सुरुवातीला खालच्या वर्गातले मुसलमान दंगलीत प्रामुख्याने बळी पडत होते. पण आता मध्यम वर्गातले आणि उच्च वर्गातले मुसलमानही या भोवऱ्यात सापडले आहेत.''[6] या दंगलीत मृत पावणाऱ्या व्यक्ती जास्त मुस्लिम असतात हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

कोणे एकेकाळी ''धर्म समाजाच्या धारणेसाठी जन्मला. मार्क्सच्या भाषेत तो पुढे अफू झाला आणि ॲडॉल्फ हिटलरने त्याला फॅसिसमचा आकार दिला. आज तो किफायतशीर धंदा आहे तसाच तो धोकादायक स्फोटक दारूगोळाही आहे.''[7] एकविसाव्या शतकातील ही वास्तविकता आहे. याच्या जोडीला मतांचं राजकारण सुरू होतं. न्यायव्यवस्थेतील दिरंगाई, तपासातील गोंधळ आणि भ्रष्टाचार, शासनाचा मंद कारभार, पोलिसांचा पक्षपातीपणा, बहुजनांचं बहुमत राजकारण्यांना आवश्यक असल्यामुळे त्यांच्या तुष्टीकरणाचा योग्य–अयोग्य मार्ग, अभिजन अपराध्यांना वाचविण्याचे भ्रष्ट प्रकार या साऱ्यांचं आजच्या व्यवस्थेत एक स्फोटक रसायन तयार होतं. एका विवक्षित क्षणी या रसायनाचा विस्फोट होतो आणि त्याचा परिणाम दंगलींच्या रूपाने समोर येतो.

धार्मिक दंगलीमागील धार्मिक अल्पसंख्याकांची मानसिकताही लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यांना वाटू लागतं, ''कायद्याने आपल्याने न्याय मिळत नाही. आपण असुरक्षित आहोत, आपल्या जीविताला, वंशाला, रोजीरोटीला आणि प्रतिष्ठेला धोका आहे.'[8] आपला धर्म संकटात आहे. अशी भूमिका मूलतत्त्ववादी तयार करतात. लोकांच्या मानसिकतेत रुजवितात. मानसिकता तयार होते. एखाद्या स्फोटक क्षणी ही मानसिकता घेऊन समूह रस्त्यावर येतो. अशा समूहाचा अनुयायी संधी मिळताच जमावाचा पेटता निखारा बनतो. तीव्र भावनावेग आणि सोबत असलेल्या बहुमतांचा आंधळा पाठिंबा त्याला सोबत करतो. विवेक नष्ट होतो. संयम पराभूत होतो. चांगले नेतृत्व बाजूला फेकले जाते आणि दंगलीची आग भडकत जाते. निरपराध माणसे मारली जातात. धर्म–जात, प्रतिष्ठा, अस्मिता आणि माणुसकीच्या अविवेकी कल्पना उन्माद पसरवितात आणि विवेकाचा आणि माणुसकीचा बळी घेत राहतात.

दंगलीची कारणे शोधली तर वाटते की, 'एवढ्या क्षुल्लक कारणावरूनही शेकडो माणसे मारली जाऊ शकतात, हे पटत नाही; पण स्वीकारावे लागते. दंगलीची सुरुवात मिरवणुकीतील प्रक्षोभक घोषणांनी, मंदिर किंवा मशीद अपवित्र करण्याने, मशिदीसमोर वाद्य वाजविल्याने, हिंदू स्त्री मुसलमानाबरोबर पळून गेल्याने किंवा मुसलमान स्त्री हिंदू पुरुषासोबत पळून गेल्याने, मशिदीवर रंग किंवा गुलाल टाकल्याने, मशिदीत मोठा शस्त्रसाठा आहे अशा अफवा परविल्याने, मिरवणुका, महाआरत्यांचे आयोजन, प्रक्षोभक भाषणे अशा अनेक कारणांनी किंवा यापैकी एका कुठल्या तरी कारणाने दंगली निर्माण होतात. यापासून संबंधित समाजाने अतिशय सजगतेने आणि संयमाने परिस्थिती हाताळली तर दंगलीत मरणाऱ्या सामान्य भारतीय नागरिकांचे प्राण वाचविले जाऊ शकतात. सामाजिक सौहार्द कायम ठेवता येऊ शकतो ही परिपक्वता समाजात निर्माण होणे आवश्यक आहे. यासाठी थोडं थांबावं लागेल एवढं मात्र निश्चित.

शेवटी हिंदू–मुस्लिम वैमनस्याची ही रक्तरंजित वाटचाल अभ्यासल्यानंतर असे वाटू लागते की, भारतीय नागरिक म्हणून आपणा सर्वांचा जन्म 15/08/1947 ला झाला. 26/01/1950 रोजी आपण सर्व धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी भारताचे अधिकृत अनुयायी झालो. विविधतेतील एकता, हीच आपणा साऱ्यांची सामूहिक संपत्ती

आहे; या संपत्तीच्या अमानुष वाटण्या करण्याचा कोणताच नैतिक अधिकार कुठल्याही धर्माच्या धर्मगुरूला नाही. असे होत असेल तर आपण सर्वांनी संघटित होऊन कर्तव्यनिष्ठेने, यथाशक्ती प्रयत्न करायला हवेत! शेवटी ''धर्मवादी गट, शक्ती इत्यादिंना भवितव्य नाही. म्हणूनच ते कडवे, जहाल, दहशतवादी आणि अमानुष बनत आहेत. अशांच्या तावडीतून आपल्या धर्मनिरपेक्ष लोकशाहीची सुटका झाली तरच आपल्याला, देशाला आणि जगाला भवितव्य उरणार आहे''[9] हा अभिप्राय यथार्थ वाटतो.

एकविसाव्या शतकात माहिती आणि तंत्रज्ञानाचा स्फोट झालेला आहे. याचा फायदाही मूलतत्त्ववादी शक्ती घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. पूर्वी गर्दी जमवणे कठीण होते. आज मात्र हजारो माणसे मोबाईल मॅसेजने, एका व्हायरल व्हिडिओमुळे जमवता येऊ शकतात. त्यामुळे एखाद्या समूहाची सांप्रदायिक भावना भडकविण्यासाठी सोशल मीडिया, इंटरनेटचा वापर केला जाऊ शकतो. अलीकडच्या काळातील नागालँडमधील घटना याचं प्रत्यक्ष उदाहरण आहे. एकविसाव्या शतकाने दिलेली ही नवी हत्यारे सांप्रदायिक शक्तींच्या हातात सापडली तर पूर्वीपेक्षाही अधिक विध्वंस होऊ शकतो. माध्यमांची ही ताकद लक्षात घेऊनच भारतीय समाजाला पुढचा प्रवास करावा लागेल. हा प्रवास अधिक धोकादायक होऊ नये याची खबरदारी घेणे हे भारतीय म्हणून आपणा साऱ्यांचेच कर्तव्य आहे. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्यही मला मान्य आहे आणि मला शांततापूर्ण समाजही आवश्यक आहे. यातून मधला मार्ग काढणे हे शेवटी सरकारचे दायित्व आहे.

## संदर्भ टिपा :–


१. दीक्षित नी.सी.'' ारताचा इतिहास' (इ.स.1761 ते इ.स. 1971), पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, दुसरी आवृत्ती, 2010 पृ. 204

२. कित्तापृ.204

३. जोशी बी.आर, तेरणीकर सुलभा (संपा.)''डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड 1'', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, 2007 पृ. 78

४. कित्ता.पृ. 78

५. पुनियानी राम, अनु. कोरडे विवेक ''हिंदूत्ववादाचे राजकारण'', एकता सामाजिक सौहार्द समिती, मुंबई, द्वितीय आवृत्ती, 2003 पृ. 86

६. तत्रैव पृ. 27

७. काळे अक्षयकुमार (संपा.)''सांप्रदायिक सद् ाव आणि सामाजिक शांतता''(कुलगुरू डॉ. श.नु.पठाण गौरव ग्रंथ), ग्लोबल हेल्थ केअर ॲण्ड एज्युकेशन फाऊंडेशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2011पृ. 239

८. पाटकर प्रदीप'झुंड', दैनिक लोकमत (पुरवणी), रविवार, 22 मार्च, 2015

९. पुनियानी राम, अनु. कोरडे विवेक उ.नि. पृ. 88